# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २२

## (सभावृत्तांत)

दिनांक–१६/०८/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १६/०८/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४) मा.मुंढे उषा अंकुश
५) मा.कोमल दिपक मेवानी
६) मा.आशा धायगुडे-शेंडगे
७) मा.गोफणे अनुराधा देविदास
८) मा.वैशाली जालिंदर काळभोर
९) मा.राजू मिसाळ
१०) मा.अमित राजेंद्र गावडे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त,मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.बहुरे,मा.दांगट,मा.राऊत मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम, मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.घुबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.आगळे-प्रशासन अधिकारी,मा.शिंपी-नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक १६) पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेबाबत...

विषय क्रमांक १७) कु.नम्रता सुनील तायडे हिला आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक १८) एच.ए. मैदानावर लष्करी युद्ध साहित्याच्या शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने झालेल्या विद्युत विषयक वाढीव कामास मान्यता देणेबाबत- मा.अनुराधा गोफणे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक १९) प्रभाग क्र.१३ मधील स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहाबाबत – मा.उत्तम केंदळे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २०) श्री.मनेश जगन्नाथ कापसे,रंगमंच मदतनीस यांचे अपिल अर्जाबाबत- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

-----------

अ) दिनांक २६/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०२/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

**निर्णय– १)** पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्थापत्य, विद्युत/एलईडी लाईटस्, पाणीपुरवठा, जलनिःसारण इ.बाबतच्या कामांच्या प्रभागस्तरावरील/मुख्य कार्यालयस्तरावरील निविदा, दहा लाखांच्या निविदा, पंचवीस लाखांच्या आतील निविदा, पंचवीस लाखांवरील निविदा किती आहेत, कोणकोणत्या आहेत, प्रभाग/वॉर्डमधील निविदांची काय परिस्थिती आहे, याचा सविस्तर तक्ता तयार करुन सन्मा.सदस्यांना द्यावा.

**२)** निविदा काढली मंजूर केली पण अजून निविदा अंतिम केली नाही अशा किती केसेस आहेत? निविदा काढली, फायनल केली पण वर्कऑर्डर दिली नाही अशा किती केसेस आहेत? निविदा काढली, कामाचा आदेश दिला आहे आणि सहा महिने झालेतरी काम सुरु झाले नाही, अशा किती केसेस आहेत? याबाबत मागील स्थायी समितीमध्ये माहिती मागितली होती, ही माहिती स्थापत्य विभाग/एखादा प्रभाग सोडल्यास अन्य कोणत्याही विभागाने अद्याप दिलेली नाही. स्थायी समितीने आदेश दिल्यानंतर त्यावर एक आठवड्याच्या आतमध्ये अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

**३)** शहरात अनेक ठिकाणी,थेरगाव,दापोडी,इंद्रायणीनगरमध्ये,भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहासमोरील उड्डाणपूलाखाली भाजीविक्रेते,हातगाड्या यांचे अतिक्रमण झाले असल्याने तिथे दररोज वाहतूक कोंडी होत असते. वाहनचालकांना, नागरीकांना याचा खूप त्रास होत असतो. हे अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमण पथक स्थापन करुन कारवाई करण्यात यावी.

**४)** शहरात एखाद्या कार्यक्रमानिमित्त नगरसेवक किंवा शहरातील सन्माननीय व्यक्तींचे फलक लागलेले असतात. संबंधित विभागाकडून कार्यक्रम झाल्यानंतर हे फलक ताबडतोब काढून टाकण्याची कार्यवाही करणेत यावी.

------------

ठराव क्रमांक –८१७ विषय क्रमांक – १

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/२/१३९०/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भाग क्र.७ वडमुखवाडी स.नं.१२३ मधील मनपाच्या ताब्यात आलेला सुविधा भुखंड विकसित करणेकामी कामाची मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम रु.८ कोटी एवढी आहे व त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३, दि.०६/०४/२०१५ नुसार मान्यता दिलेली आहे. सदरची वाढीव कामे ठेकेदार मे.पी.एन. नागणे यांचे मार्फत करावयाची असल्यास प्रस्तुत कामास मा. स्थायी समितीची सुधारीत मान्यता घ्यावी लागणार आहे. सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम २,३८,४८,९६७/- एवढी आहे.(वाढीव खर्च र.रु.४३,१६,७०४/- एवढा आहे.) प्रस्तुत वाढीव खर्च प्रशासकीय मान्यतेच्या कमाल मर्यादित होणार आहे, त्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब कामाचे सुधारीत वाढीव खर्चाच्या प्रस्तावास (भाववाढ फरकासह कमी/जास्त) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१८ विषय क्रमांक – २

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/४३६/२०१७ दि.२/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम. रुग्णालयाच्या ३ वर्षे इमारतीमधील कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरुम, मुता-या व रुग्णालयाच्या बाहय परिसराचे (रस्ते व पार्कींग सह गार्डन) व रुग्णालयातील डक्ट व ड्रेनेज लाईन साफसफाईचे व स्वच्छता हे काम लघुत्तम ठेकेदाराकडुन (सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने) स्वत:ची अत्याधुनिक उपकरणे, रसायने व मनुष्यबळाचा वापर करुन तांत्रिक पध्दतीने (Mechanized Cleaning) साफसफाई व स्वच्छता M/s. BVG India Ltd यांचेकडून प्राप्त झालेल्या ई-निविदा दर प्रति महिना खर्च र.रु.२२,६१,५००/- प्रमाणे दिनांक ०१/०८/२०१७ पासून करुन घेणेकामी तसेच निविदेत नमुद केलेप्रमाणे तीन वर्ष कालावधीकरीता किमान वेतन कायदा दराप्रमाणे मनुष्यबळाचे दर ग्राहय धरुन व इतर कोणतीही वाढ न देता म्हणजेच आवश्यक लागणारी उपकरणे, रसायने व तत्सम् बाबींसाठी लागणा-या खर्चामध्ये वाढ न करता करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१८(अ) विषय क्रमांक – ३

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/६८०१/२०१७ दि.०४/०८/२०१७

विषय – पर्यावरण विभागाकडील महसूली कामांचे तरतुदींमधून अंतर्गत वर्गीकरण करणेबाबत...

मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.३ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८१९ विषय क्रमांक – ४
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१७१/२०१७ दि.१८/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 01-2016/17 मधील अ.क्र.01 अन्वये भोसरी येथील विद्युत दाहिनी दोन वर्षाकरीता ठेका पध्दतीने खाजगी संस्थेस चालन देखभाल दुरूस्ती करणेकामी (सन 2017-19) मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.37,95,048/- (अक्षरी र.रू.सदत्तीस लाख पंच्च्याण्णो हजार अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा 3.33% कमी (सुधारीत दर) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२० विषय क्रमांक – ५
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/कामा/(भां)/कावि/७३/२०१७ दि.०७/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रूग्णालय व म.न.पा.चे इतर दवाखाने/रूग्णालय यांना तातडीने आवश्यक औषधे/साहित्य खरेदी कामी निविदा क्र.१/२०१४-१५ अन्वये नियुक्त **मे.कोठारी मेडिकल संत तुकारामनगर पिंपरी-१८** यांचेबरोबर पुर्वी झालेल्या करारनाम्यास अधिन राहुन तातडीने आवश्यक औषधे/साहित्याची खरेदी ही **Branded औषधांचे MRP वर ९.२५% Generic औषधांचे MRP वर ५२% व सर्जीकल साहित्याचे MRP वर ४३% सवलत** या दराने पुरवठा करणेच्या आदेशास मुदत वाढ मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१९१०९ दि.१५/१२/२०१६ अन्वये मान्यता दिलेल्या र.रू.१०,००,०००/- पर्यंत खर्चाचे मंजुर रकमेपेक्षा वाढीव खर्च र.रू. ५,००,०००/-(अक्षरी रक्कम रूपये पाच लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२१ विषय क्रमांक – ६
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – शिक्षणमंडळ
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.शिमं/९/कावि/१३७/२०१७ दि.०५/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

सकाळ पेपर्स आयोजित एनआयई हा उपक्रम सकाळ माध्यम समूहाच्या वतीने मागील नऊ वर्षापासून इयत्ता ४ थी ते इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सकाळ एनआयई हा उपक्रम राबवित आहे. या उपक्रमात सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. सकाळ एनआयई हा राज्यस्तरीय विशेषांक महिन्यातून दोनदा प्रसिध्द केला जातो. तसेच विविध मान्यवर

तज्ञ वक्त्यांच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. वरील प्रमाणे याही वर्षी हा उपक्रम राबविणेत यावा असे या कार्यालयास कळविले आहे. सदर उपक्रमासाठी गत वर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्यन साधने या लेखाशिर्षावर करणेत आलेल्या र.रू.७,५०,०००/- तरतूदीमधून करणेत येईल सदरचा उपक्रम थेट पध्दतीने करारनामा न करता करण्यास तसेच याकामी ७,५०० X १०० = ७,५०,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच शालेय जीवनातील महत्वाचा टप्पा म्हणजे दहावीचे वर्ष, त्यातच दिवसेंदिवस वाढणा-या जीवघेण्या स्पर्धेमुळे दहावीतील विद्यार्थ्यांचा जीव मेटाकुटीला येतो. भविष्याचे आव्हान, पुढे आपण काय करणार या प्रश्नींची टांगती तलवार आणि सगळ्यांच्या बरोबरीने वाढणारे पालक आणि नातेवाईकांच्या अपेक्षांचे ओझे, या सगळ्यांचा मिळून एक ताण दहावीतील विद्यार्थ्यांच्या मनावर येतो. तो ताण कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्जवल भविष्यासाठी लोकसत्ता मार्फत '**लोकसत्ता यशस्वी भव**' ही योजना येत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या अधिक सरावासाठी '**यशस्वी भव**' मध्ये पाठ्यपुस्तकावर आधारीत संतुलित लेखन, स्वाध्याय, सराव प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरे यांचा समावेश असणार आहे. या योजनेचा कालावधी १७० दिवस असुन त्यास प्रति विद्यार्थी र.रु.५५५/- प्रमाणे खर्च येणार असून महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या ५४० विद्यार्थ्यांकरीता ही योजना राबविण्यास व त्याकरीता येणा-या र.रु.२,९९,७००/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२२ विषय क्रमांक – ७
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय,विद्युत
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इक्षेका/वि/५६८/२०१७ दि.०९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सखुबाई गबाजी गवळी उद्यान येथे आकर्षक विद्युत कारंजे विकसीत करणेत येत असलेल्या प्रकल्पास लघुदाब वीजपुरवठा घेणेकामी म.रा.वि.वि.कं., पुणे यांचे दि.१९-०७-२०१७ चे मंजुर लोड सॅक्शन ऑर्डरमधील फर्म कोटेशन/डिमांड नोट मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व्हीस कनेक्शन चार्जेस, प्रोसेसींग फी, सुरक्षा ठेव, अग्रीमेंट फी व सुपरव्हीजन चार्जेस, सेवाकरासह असे एकुण र.रु.४०,९२०/- (अक्षरी र.रू.चाळीस हजार नऊशे वीस फक्त) म.रा.वि.वि. कंपनी, पुणे यांस अदा करणेस व सदरचा खर्च स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२३ विषय क्रमांक – ८
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/२२३/२०१७ दि.१०/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शुक्रवार, दि.२१/७/२०१७ रोजी Tamarind, Indian Habitat Centre(IHC), Lodhi Colony, New Delhi येथे Ministry of Housing and Urban Affairs, नवी दिल्ली यांचे मार्फत स्मार्ट सिटी अभियानाची प्रभावी

अंमलबजावणी करणेचे दृष्टीने आयोजित प्रशिक्षणास सहभागी होणेकरिता श्री.अंबादास चव्हाण, शहर अभियंता, स्थापत्य विभाग व श्री.निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचे विमान प्रवासा करीता आलेल्या खर्चाची र.रू.४१,५७७/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस हजार पाचशे सत्याहत्तर फक्त) सेवा करांसह मे.RADIANT AIRLINKS PVT. LTD. यांना अदा करणेस व सदरचा खर्च माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये उपलब्ध असलेल्या मनपा अंदाजपत्रकातील "स्मार्ट सिटी Initiative अंतर्गत IT Back Bone Infrastructure" या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२४ विषय क्रमांक – ९

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१५२/१७ दि.१०/०८/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील **नि.नो.क्र.५/१०-२०१६-१७** अन्वये **प्रभाग क्र.४४ अशोक थिएटर पिंपरी मध्ये स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामेकरणेकामी मे. साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.८,२९,२५०/-(अक्षरी र.रु.आठ लाख एकोणतीस हजार दोनशे पन्नास फक्त)** पेक्षा **२२.२७% कमी** या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने **र.रु ६,४४,५७६/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२५ विषय क्रमांक – १०

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१५४/१७ दि.१०/०८/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील **नि.नो.क्र.५/६०-२०१६-१७** अन्वये **प्रभाग क्र.४३ जिजामाता हॉस्पीटल येथील रस्त्यांवरील चरांची, खड्डयांची खडी मुरुमाने व बी.बी.एम पध्दतीने दुरुस्तीची कामे करणेकामी मेडी डी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.८,४०,२३८/- (अक्षरी र.रु. आठ लाख चाळीस हजार दोनशे अडोतीस फक्त)** पेक्षा **११.११% कमी** या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने **र.रु ७,४६,८८८/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८२६ विषय क्रमांक – ११
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१५१/१७ दि.१०/०८/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील **नि.नो.क्र.५/६८-२०१६-१७** अन्वये **प्रभाग क्र. अशोक थीएटर पिंपरी मध्ये किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे. एस एस साठे नि.र.रु.७,८२,१३५/- (अक्षरी र.रु.सात लाख ब्याऐंशी हजार एकशे पस्तीस फक्त)** पेक्षा **२६.००% कमी** या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने **र.रू.५,७८,७८०/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२७ विषय क्रमांक – १२
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१५३/१७ दि.१०/०८/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील **नि.नो.क्र.५/९१-२०१६-१७** अन्वये **प्रभाग क्र.५६ वैदुवस्ती येथील विविध रस्त्यांवरील चरांची, खड्डयांची खडी मुरुमाने व बी.बी.एम पध्दतीने दुरुस्ती करणेकामी मे. श्री सदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन नि.र.रु ७,००,२३०/- (अक्षरी र.रु.सात लाख दोनशे तीस फक्त)**पेक्षा **१७.००% कमी** या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने **र.रु.५,८१,१९१/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२८ विषय क्रमांक – १३
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/०८/कावि/८९९/२०१७ दि.०९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये पी.जी. इन्स्टिट्युट करीता दरमहा शासकीय वेतन श्रेणीनुसार हंगामी स्वरूपात (३ वर्षे) कालावधीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखती/लेखी परिक्षा घेवुन अधिष्ठाता हे पद (०१) भरणेस शासकीय वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करणेस व जर

आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास पुढील हंगामी स्वरूपात (३ वर्षे) कालावधीकरीता सदर पदासाठी Walk in interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८२९ विषय क्रमांक – १४

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/५०२/२०१७ दि.०८/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/१०/२०१६-१७ अन्वये अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र.3 व 4 योजनेअंतर्गत 30 द.ल.लि. क्षमतेचे पंपांकरिता न्यूट्रल सॉफ्ट स्टार्टर बसविणेकामी मे. एक्सेल इलेक्ट्रिकल्स निविदा रक्कम रू.६८,०३,०६४/- (अक्षरी र.रू.अडुसष्ट लाख तीन हजार चौसष्ट फक्त) पेक्षा १.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७०,७१,७८५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसारव निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३० विषय क्रमांक – १५

दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – अभिलेख कक्ष

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आभि/२/कावि/५२६/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००७ व पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपविधी २००३ नूसार सर्व विभागाचे अभिलेख वर्गीकरणाप्रमाणे जतन होणे आवश्यक आहे. त्यानूसार महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षामध्ये अभिलेखाचे A, B, B1, C, D याप्रमाणे सर्व विभागाचे वर्गीकरण कामकाज सुरु आहे. सदर कामकाजाची माहिती असलेल्या शासन सेवेतील श्री.ए.ए.शेख. सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांच्या अभिलेखापाल पदावरील नेमणूकीस आदेश क्रं.अभिकक्ष/१/कावि/ २६१/२०१७ दिनांक १९/०५/२०१७ अन्वये सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांची मुदत ३१/०८/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७७५/प्र.क्र.१००/२०१३ दिनांक ०८/०१/२०१६ अन्वये अभिलेख कक्षाचे कामकाजासाठी श्री.ए.ए.शेख सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची दि.१/९/२०१७ पासून सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रू.१७,०००/- (अक्षरी र.रु.सतरा हजार फक्त) इतक्या एकत्रित मानधनावर नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –८३१ विषय क्रमांक – १६
दिनांक – १६/०८/२०१७ विभाग – पशुवैद्यकिय
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/३४६/२०१७ दि.१६/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोकाट व भटक्या कुत्र्यांचे संख्या नियंत्रण ठेवणेचे कामकाजासाठी श्वान संतती नियमण शस्त्रक्रिया राबविणेकामी (ABC) तुलनात्मकरित्या प्राप्त लघुत्तम दर निविदाधारक अनुक्रमे (१) मे.सोसायटी फॉर दि प्रिव्हेंशन ऑफ क्रूएल्टी टू ऍनिमल्स, उदगीर, लातूर (२) मे.ऍनिमल वेलफेअर असोसिएशन, नवी मुंबई (३) मे.पिपल फॉर ऍनिमल्स, पुणे या तिन्ही संस्थांचे र.रु.६९३/- प्रती श्वान असे लघूत्तम दर स्विकृत करुन संस्थेसमवेत करारनामा करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास १ वर्ष कालावधीकरीता मान्यता देणेत येत आहे. तसेच कुत्र्याचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करतेवेळी सदर कुत्र्याचे फोटो काढावेत. तसेच निर्बीजीकरण केलेल्या प्रत्येक कुत्र्याचे आयस्कॅन करण्यात यावे. सदर कामाचे बील अदायगी करतेवेळी वरील दोन्ही पुरावे बीलासोबत असल्याशिवाय बील अदा करु नये या अटीसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३२ विषय क्रमांक – १७
दिनांक – १६/०८/२०१७
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

कु.नम्रता सुनील तायडे, शरदनगर, चिंचवड, पुणे हिची दि.२४ ते २७ ऑगस्ट २०१७ या काळात होणा-या 3rd World Taekwondo Cadet Championship, Sharm El, Sheikh, Egypt 2017 या स्पर्धेसाठी निवड झाल्याने स्पर्धेस जाण्याकरिता म.न.पा. क्रीडा धोरणानुसार व तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली ११००४९ यांचेकडील पत्र क्र. TFA/IC/038/2017-18 DT.8/8/2017 चे पत्रात नमूद 3rd World Taekwondo Cadet Championship, Sharm El, Sheikh, Egypt 2017 स्पर्धेस जाण्याकरिता स्पर्धा खर्च प्रस्तावातील अंदाजपत्रकात नमूद एकूण खर्च र.रु.९५,०००/- चे ७५ टक्के म्हणजेच एकूण आर्थिक सहाय्य र.रु.७१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्काहत्तर हजार दोनशे पन्नास फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३३ विषय क्रमांक – १८

दिनांक – १६/०८/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

भारतीय सैन्यदल व पिंपरी चिंचवड मनपाच्या संयुक्त विद्यमाने एच.ए. मैदानावर लष्करी युद्ध साहीत्याच्या शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रम २ दिवसांचे करण्याचे ठरले होते. (दि.११/०८/१७ व दि.१२/०८/१७) त्यास लागणा-या विद्युत विषयक कामे करणेस, ध्वनिक्षेपण, विद्युत, एल.ई.डी. स्क्रीन, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे इ. अत्यावश्यक कामे करणेस र.रु.६,३९,१३७/- या खर्चास दि.१०/०८/२०१७ रोजीचे मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. सदर कार्यक्रम आणखी एक दिवसाने वाढविणेस मा.आयुक्त साहेबांनी सुचना दिलेली असल्याने सदर कार्यक्रम दि.१३/०८/२०१७ रोजी एक दिवसाने वाढविणेत आला. त्या अनुषंगाने झालेल्या विद्युत विषयक वाढीव कामास व त्यामुळे होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३४ विषय क्रमांक – १९

दिनांक – १६/०८/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक–मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.१३ मधील स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृह ऑल इंडीया सेंट्रल गव्हर्नमेंट पेंशनर असोसिएशन, पिंपरी चिंचवड शाखा यांना नाममात्र र.रु.१,०००/- इतक्या दराने ११ महिने कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे. असोसिएशनच्या वतीने सामाजिक उपक्रम,योगा,सांस्कृतिक उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका इ.साठी व असोसिएशनच्या मध्यमवर्गीय कुटूंबातील नागरीकांना सहज पद्धतीने उपलब्ध करुन देणेचे प्रयोजन करणेत येणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३५ विषय क्रमांक – २०

दिनांक – १६/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक–मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे,मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव-

श्री. मनेष जगन्नाथ कापसे–रंगमंच मदतनीस यांचा दिनांक ११/०८/२०१७ चा अपील अर्ज.

विषय क्र.२० कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२० चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/६५/२०१७
दिनांक - २२/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.